ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९२५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधान: ” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ पुणें, बुधवार तारीख २ मे, १९६२ अंक ९




लोकशाही समाजवाद हे आपल्या देशाचे ध्येय होय. द्वितीय वर्धापन दिनाच्या दिवशीं महाराष्ट्राला आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करून सांगावयाचे आहे कीं, शेती आणि औद्योगिक क्षेत्रांत शांततामय क्रांति घडवून आणून हे ध्येय साध्य करण्यांत येईल. ह्या वर्धापन दिनीं राज्यांत सुरू होणारी सत्ता विकेंद्रीकरणाची योजना म्हणजे ह्या ध्येयाप्रत जाण्याची एक पायरीच होय.

१ मे १९६२ महाराष्ट्र राज्याचा
द्वितीय वर्धापन दिन

संचालक प्रसिद्धी विभाग–महाराष्ट्र सरकार मुंबई.

# विविध माहिती

**नाट्यगृहांसाठी फंड**—सध्यां महाराष्ट्रांतील मोठ्या शहरांतून सुद्धां नाटकें करण्यासाठी खास नाट्यगृहें नाहींत. त्यामुळें नाट्यव्यावसायिकांची व रसिक प्रेक्षकांची बरीच कुचंबणा होते. ती टाळण्यासाठी नाट्यगृहें बांधण्याचा विचार सरकार करीत आहे. ह्या कामासाठी १० लाख रुपयांचा निधि जमविण्याचा विचार करण्यांत येत आहे.

**परदेशीय कापडाची होळी**—ब्रिटनमध्यें परदेशीय स्वस्त कापडाची आयात मोठ्या प्रमाणावर होत असल्यानें तेथील कापडकारखानदार चिंताग्रस्त झाले आहेत. अशा स्वस्त परदेशी कापडाची होळी करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. लंडनच्या गजबजलेल्या भागांत हा कार्यक्रम उरकण्यांत येणार आहे. ब्रिटनमधील कापडाच्या चढ्या किंमतीं खाली आणण्यासाठी सरकारच ह्या कापडाची आयात करीत असते.

**सिकिम राज्याचा विकास**—सिकिम राज्यांतील विकासाच्या निरनिराळ्या कामांत एकसूत्रता आणण्यासाठी भारत सरकार आपला एक खास अधिकारी तिकडे पाठविणार आहे. सिकिम सरकारच्या विकास खात्यांतून काम करण्यासाठी एकूण १८ तज्ज्ञ सिकिमला जाणार आहेत. त्यांत सहाजण शेतीचे तज्ज्ञ आहेत.

**आंधळे अधिक चांगलें काम करतात**—दृष्टि शाबूत असलेल्या कामगारांपेक्षा आंधळे कामगार अधिक एकतानतेनें काम करतात, असें बंगलोर येथील टेलिफोनच्या कारखान्यांतील अनुभवावरून दिसून आलें आहे. दृष्टि असलेले कामगार काम करतांना इकडे तिकडे पाहतात त्यामुळें कामावर परिणाम होतो. आंधळी माणसें शिवणें, विणणें, इत्यादि कामें फार चांगल्या दर्जाचीं करतात असेंहि आढळून आलें आहे.

**तिबेटी निर्वासितांना काम**—तिबेटमधून आलेले ६,२०० निर्वासित सध्यां सिकिममध्यें रस्ते बांधण्याच्या रोजगारावर आहेत. परंतु हें काम आतां लवकरच संपणार आहे. त्यानंतर त्यांना सिकिममधील खाणीमधून आणि नव्यानें लागवड करण्यांत यावयाच्या चहाच्या मळ्यांतून काम दिलें जाईल. पश्चिम सिकिममध्यें चहाच्या लागवडीस अनुकूल अशी भूमि व हवामान आहे.

**सरकारी मालकीचा छापखाना**—भारत सरकार पश्चिम जर्मन सरकारच्या साह्यानें एक मोठा छापखाना काढणार आहे. प्राथमिक शाळेंत जाणाऱ्या मुलांसाठी साधीं व रंगीत पुस्तकें छापण्याचें काम ह्या छापखान्यांत करण्यांत येणार आहे. छापखान्यासाठी मोफत जमीन देण्याचें मद्रास सरकारनें मान्य केलें आहे. छापखान्याच्या उभारणीसाठी ४० लाख रुपये भांडवल लागेल.

**उत्तरप्रदेशांतील साखरेचे कारखाने**—उत्तर प्रदेशांतील साखर कारखान्यांपुढें असणाऱ्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती राज्यसरकार नेमणार आहे. ह्या समितीवर कारखानदार, उसाचे शेतकरी, व्यापारी, ग्राहक, इत्यादि हितसंबंधीयांचे प्रतिनिधि नेमण्यांत येणार आहेत. उत्तर प्रदेशांतील साखरेचा धंदा स्पर्धेत टिकण्यासाठी काय करावें ह्याबद्दल समिति शिफारसी करणार आहे.

**महाराष्ट्राचे माजी गव्हर्नर**—महाराष्ट्र राज्याचे नुकतेच सेवानिवृत्त झालेले गव्हर्नर श्री. श्रीप्रकाश हे डेहराडून येथें स्थायिक झाले आहेत. कांहीं दिवस विश्रांति घेऊन ते आपल्या वडिलांचें चरित्र लिहिण्यास प्रारंभ करतील. त्यांचे वडील डॉ. भगवानदास मोठे पंडित होते. त्यांना भारतरत्न पदवी मिळालेली होती.

**कराचींत पासपोर्टाचा चोरबाजार**—पोलिसांच्या दक्षतेला व कडक उपायांना न जुमानता कराचींत पासपोर्टाचा चोरबाजार चांगलाच फोफावला आहे. पूर्व पाकिस्तानांतून हजारों पाकिस्तानी नागरिक ब्रिटनला जाऊं पाहात आहेत. त्यामुळें ह्या बाजाराची चांगलीच चलती झाली आहे. ठराविक माणसाला २,००० रुपये दिल्यास कराचींत २४ तासांत पासपोर्ट मिळू शकतो आणि प्रवासाची व इतर सर्व व्यवस्था होऊ शकते, असें म्हणतात.

**कृत्रिम रबराचा नवा प्रकार**—ब्रिटनमधील डनलॉप कंपनीच्या संशोधनकेंद्रानें कृत्रिम रबराच्या एका नव्या प्रकारचा शोध लावला आहे. नवीन रबराच्या उत्पादनास एका कंपनीनें प्रारंभहि केला आहे. मोटारगाडीसाठी विश्वसनीय आणि मजबूत टायर्स पुरविण्याच्या कामीं ह्या रबराचा पहिला क्रमांक लागेल, अशी निर्मात्यांना खात्री वाटत आहे.

**डिझेल तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें**—डिझेल तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें तयार करण्यासंबंधी भारत सरकार आणि एक अमेरिकन कंपनी ह्यांच्यांत करार करण्यांत आला आहे. हीं एंजिनें तयार करण्यासाठी उत्तर प्रदेशांत वाराणसी येथें कारखाना उभारण्याचा सरकारचा मानस आहे. १९६३ पासून उत्पादनाला प्रारंभ होईल व दरसाल २५० एंजिनें तयार करण्यांत येतील.

**धूम्रपानाचा परिणाम**— गर्भवती असतांना धूम्रपान करणाऱ्या स्त्रियांचीं मुलें वजनानें कमी भरतात आणि त्यांचें आरोग्यहि निकृष्ट असतें, असें अमेरिकन संशोधकांना आढळून आलें आहे. दररोज ओढण्यांत येणाऱ्या सिगारेटसचें प्रमाण आणि मुलांचें जन्मानंतरचें वजन, ह्यांचा निकटचा संबंध संशोधनांत प्रस्थापित झाला.

**म्हैसूर राज्यांतील मोफत शिक्षण**—म्हैसूर राज्यांतील ज्या लोकांचें उत्पन्न दरसाल १,२०० रुपयांपेक्षा अधिक नाहीं त्यांच्या मुलांना माध्यमिक शाळेंतील शिक्षण मोफत देण्यांत येतें. परंतु ही मर्यादा वाढवून सालीना २,४०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची सवलत देण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे.

**जम्मू प्रांतांत वीज निर्मिति केंद्र**—जम्मू प्रांतांत कोळशाच्या उष्णतेनें वीज निर्माण करण्याचें एक केंद्र उभारण्यांत येत असून त्याचें प्राथमिक काम पूर्ण झालें आहे. केंद्रासाठी २५० लाख रुपये खर्च येणार आहे. तें उभारण्याच्या कामांत युगोस्लाव्हियाच्या तंत्रज्ञांची मदत घेण्यांत आली आहे. केंद्राला लागणारा कोळसा जवळच्या खाणींतून मिळण्यासारखा आहे.

**फळें टिकविण्याविषयीं संशोधन**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत फळें टिकविण्याच्या बाबतींत संशोधन करणारीं नऊ केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या संशोधनकेंद्रांसाठी भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यानें १·२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. दिल्ली, सहाराणपूर, गोहत्ती, पुणें, सिमला, कुलु, नागपूर, कलकत्ता व त्रिचूर ह्या ठिकाणीं केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत.

**सिमेंटचे नवे कारखाने**—उत्तर प्रदेशांत एक आणि म्हैसूर राज्यांत एक असे दोन सिमेंटचे कारखाने लवकरच उत्पादनास प्रारंभ करतील. दोन्ही कारखाने मिळून दरसाल ३ लाख टन सिमेंट निर्माण करतील, असा अंदाज आहे. दोन्ही कारखाने चालू झाल्यावर सिमेंटचा तुटवडा कांहीं प्रमाणांत कमी होईल.

# अर्थ

बुधवार, ता. १ मे, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दारिद्र्याचीं कारणें नेमकीं सांगतां येतील काय ?

अमेरिकेचे भारतामधील वकील मि. जे. के. गालब्रेथ ह्यांनीं गुजरात विद्यापीठांत एक उद्बोधक व्याख्यान दिलें. त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'दारिद्र्याचीं कारणें' असा होता. अर्थात् व्यक्तीच्या दारिद्र्यापेक्षा समाजांच्या दारिद्र्याच्या कारणांची मीमांसाच त्यांना अभिप्रेत होती. ह्या विषयावर अलीकडे जगभर चर्चा चालू आहे. तथापि सामाजिक दारिद्र्याचें स्वरूप काय आहे, त्याचीं लक्षणें काय आहेत आणि त्याचीं कारणें काय आहेत, ह्यासंबंधीं चांगल्या जाणकार माणसांत सुद्धां एकमत आढळून येत नाहीं. थोडक्यांत म्हणजे, दारिद्र्य हा रोग असल्याचें मान्य झालें असलें तरी त्याच्या कारणांवर अद्याप कोणाला नेमकें बोट ठेवतां आलेलें नाहीं. मि. गालब्रेथ ह्यांनीं आपल्या भाषणांत दारिद्र्याबद्दल जीं कारणें सामान्यत: सांगण्यांत येतात तीं सांगितलीं आहेत. तीं अशीं :—( १ ) देश गरीब आहे; कारण देशांतील लोक आळशी, आकांक्षा नसणारे, अविश्वसनीय आणि खुशालचेंडू वृत्तीचे आहेत. ( २ ) देशांत जे परदेशीय राज्यकर्ते राज्य करीत होते, त्यांनीं देश मुद्दामच दरिद्री ठेवलेला आहे. ( ३ ) दारिद्र्य हें वर्गविरोधाचें आणि पिळवणुकीचें फलित आहे. ( ४ ) अज्ञानामुळें दारिद्र्याची निष्पत्ति होते. ( ५ ) युद्ध, आपसांतील यादवी आणि वाईट राज्यकारभार ह्यांच्यामुळें दारिद्र्य उत्पन्न होतें. ( ६ ) दारिद्र्य हा अपुऱ्या भांडवलाचा परिणाम आहे. ( ७ ) अति लोकसंख्या हें दारिद्र्याचें कारण आहे. ( ८ ) मागसलेपणामुळें दारिद्र्याचा उगम होतो. ( ९ ) लोक गरीब असतात ह्याचें कारण त्या देशांत नैसर्गिक साधनसामग्रीच कमी असतें. ह्या सर्वच कारणांत थोडेंफार सत्य आहे; परंतु तीं सर्वस्वीं खरीं आहेत असें म्हणतां येणें कठीण आहे.

पहिलें कारण आतां कोणी फारसें पुढें करीत नाहीं. दुसरें कारण बऱ्याच वेळां अजूनहि सांगण्यांत येतें. परंतु जगांतील पुष्कळ भागांतील वसाहतींचीं राज्यें आतां नष्ट झालेलीं आहेत. तिसऱ्या कारणाला बराच पाठिंबा मिळतो आणि ह्या कारणामागें कांहीं तर्कशुद्ध विचारहि आहेत.परंतु तेंहि सर्वस्वीं खरें म्हणतां येत नाहीं. उदाहरणार्थ, भारत व पाकिस्तान ह्यामधील छोटा शेतकरी घ्या. त्याच्या मालकीची थोडीशी जमीन असते. त्याची कांहीं कोणाकडून पिळवणूक होत नसते. तरी पण ते गरीबच राहिलेले दिसतात. अज्ञानामुळें दारिद्र्य उत्पन्न होतें, ह्या म्हणण्यांतहि फारसा अर्थ नाहीं. कारण, कांहीं लोक निरक्षर का राहिले हा प्रश्न शिल्लक उरतोच. पांचव्या कारणांतहि फारसा अर्थ नाहीं. भारतासारख्या स्थिर सरकार असलेल्या देशांतहि दारिद्र्य आढळतेंच. भांडवलाच्या अभावीं दारिद्र्य फोफावतें हें मत अलीकडे बरेंच वेळां मांडण्यांत येतें. भांडवलाच्या साह्यानें दारिद्र्यावर मात करतां येते हें खरें असलें, तरी ज्या देशांजवळ तेलासारखी नैसर्गिक साधनसंपत्ति आहे असे देशहि गरीब का राहतात ह्याचा खुलासा वरील कारणानें होत नाहीं. अति लोकसंख्या हें दारिद्र्याचें कारण म्हणावें तर हॉलंड व बेल्जमसारखे लोकसंख्येनें गजबजलेले देश राहणीच्या दर्जाच्या मानानें सधन दिसतात,तर उलट अरबस्तानांतील थोडी लोकसंख्याहि दरिद्री असलेली दिसून येते. आधुनिक उत्पादनपद्धतीनेंहि लोकांची दारिद्र्यापासून सुटका होणें कठीण आहे. कारण, ह्या उत्पादनपद्धतीचा फायदा घेण्यासाठी तांत्रिक शिक्षण आणि भांडवल ह्यांची प्रथम जरूरी आहे. त्यांच्या अभावीं उद्योगधंद्यांच्या व शेतीच्या जुन्या पद्धतीलाच चिकटून राहावें लागेल. नुसती नैसर्गिक साधनसामग्री पुरेशी नाहीं, हेंहि कारण लंगडेंच पडतें. ह्याचा अर्थ एवढाच, कीं ह्या सर्व कारणांच्या मिश्रणामुळें दारिद्र्य कमी–अधिक प्रमाणांत आढळून येतें; त्यावर उपायहि तशाच मिश्रणाच्या स्वरूपाचा हवा; एकच रामबाण उपाय सांगतां येणार नाहीं.

---

### औद्योगीकरणाचा परिणाम दिसत कां नाहीं ?

केरळ राज्यांतील औद्योगीकरणाचा अभ्यास करण्यासाठी श्री. जी. एल. मेहता तिकडे गेले होते. भारताच्या इंडस्ट्रिअल क्रेडिट ॲण्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे ते अध्यक्ष आहेत. आपल्या दौऱ्यांत औद्योगीकरणाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण करण्यानें देशाची प्रगति होणार नाहीं. उद्योगधंदे काढतांना अनुकूल अशी आर्थिक परिस्थिति आणि लोकांची पुढाकार घेण्याची वृत्ति, ह्या दोन्ही गोष्टींची आवश्यकता आहे. गेल्या १४ वर्षांच्या कालांत भारतानें लक्षांत घेण्यासारखी प्रगति केलेली आहे. परंतु ह्या प्रगतीचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम झालेला दिसत नाहीं. ह्याचें कारण, भारत देश फार मोठा असून त्याची लोकसंख्याहि झपाट्यानें वाढत आहे. असें असलें तरी औद्योगीकरणाची गति वाढेल, त्या प्रमाणांत अर्थव्यवस्था सुधारूं लागेल.

---

### गोऱ्या वसाहतवाल्यांना मागणी

दक्षिण आफ्रिका व पोर्तुगाल या दोघांची सरकारें आफ्रिकेंतील त्यांच्या प्रदेशांत अधिक गोरे वसाहतवाले आणण्याची जोराची खटपट करीत आहेत. आफ्रिकेच्या इतर भागांत राहणाऱ्या गोऱ्या वसाहतवाल्यांमधून ५० हजार ते १ लाख गोरे लोक द. आफ्रिकेंत राहण्यास यावेत म्हणून दक्षिण आफ्रिकेचें सरकार त्यांना सवलती देण्यास तयार आहे. ह्या कामासाठी नैरोबी येथें द. आफ्रिकन सरकारचें एक कमिशन आलें असून केनिआंतील गोऱ्या शेतकऱ्यांना द. आफ्रिकेंत येण्यास आमिषें दाखविण्यांत येत आहेत. कांहीं शेतकऱ्यांना नाताळमध्यें जमिनीसुद्धां देण्यांत आल्या आहेत. आफ्रिकेंत मोझँबिक व अंगोला ह्या पोर्तुगीज वसाहतींतूनहि अधिक गोरे वसाहतवाले भरण्याचे प्रयत्न चालू आहेत.

---

### मधमाशांसंबंधीं रशियन पुस्तकाचें तामीळ भाषांतर

मधमाशांसंबंधीं एका रशियन पुस्तकाचें तामीळ भाषांतर नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. मॉस्को येथील फॉरिन लँग्वेजेस पब्लिशिंग हाउसनें तें तयार केलें आहे.

# नव्या करवाढीचें स्वरूप

## प्रत्यक्ष कर

(१) भारतीय कंपन्यांवरील कराचें प्रमाण ४५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत येईल, तर परकीय कंपन्यांवरील कराचें सर्वसाधारणत: ६३ टक्के प्रमाण यापुढेंहि चालू ठेवण्यांत येईल. यासाठीं सर्व भारतीय कंपन्यांना लागू असलेला प्राप्तीकर २० टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत येत असून सुपर-टॅक्सच्या प्रमाणांत यथायोग्य रीतीनें बदल करण्यांत येतील. या करांतून निर्यातींतून आलेल्या उत्पन्नास सूट मिळेल.

(२) सरबराई व पाहुणचार वगैरे खर्चाच्या परवानित बाबींची यादी अधिक कसोशीनें करण्याचा विचार आहे.

(३) व्यक्ति, अविभक्त हिंदु कुटुंबें आणि न नोंदविलेल्या फर्म यांच्यावरील प्राप्तीकर आणि सुपर टॅक्स यांच्या कोष्टकांतहि फेरफार करण्यांत येईल. सर्वांत वरील श्रेणीच्या बाबतींत, जादा आकार सोडून हा दर ७२·५ टक्के राहील, तर ५,००० रुपयांहून कमी प्राप्तीवर कराचा दर आहे तोच राहील. मधल्या श्रेणींच्या बाबतींत करवाढ समान प्रमाणांत व्हावी अशा प्रकारें करांत फेरबदल करण्यांत येणार आहेत.

(४) प्रॉव्हिडंट फंडांत भरलेल्या रकमा व भरलेले विम्याचे हप्ते यांच्या बाबतींत प्राप्तीकराची सूट मिळण्यासाठीं आलेली रकमेची मर्यादा आतां वाढवून १०,००० रुपये करण्यांत येणार आहे.

(५) संचित मुदतीच्या ठेवीच्या योजनेची कक्षा व व्याप्ति वाढविण्याचें ठरलें असून त्या बाबतींतहि प्राप्तीकरांत सूट देण्याचा विचार आहे.

(६) रजिस्टर्ड फर्मच्या बाबतींत आकारण्यांत येणाऱ्या करांच्या पद्धतींत सुधारणा करण्याचा विचार आहे. सुटीसाठीं असलेली मर्यादा कमी करून, निरनिराळ्या पातळींवरील कर-आकारणीच्या दरांत फेरफार करून, आणि पांच किंवा अधिक भागीदार असलेल्या फर्मच्या बाबतींत अधिक दरानें कर आकारणी, या प्रकारें हे बदल करण्याचा विचार आहे.

या सर्व उपाययोजनांमुळें सुमारें १५ कोटी रुपयांहून थोडें अधिक उत्पन्न मिळेल.

(७) गेल्या पांच वर्षांपासून लागू असलेला खर्च-कर चालू वर्षापासून रद्द करण्यांत येत आहे. त्यामुळें उत्पन्नांत ७० लक्ष रुपये तूट येईल.

(८) संपत्तिकराचे दर सर्वांत वरच्या दोन श्रेणींच्या बाबतींत ०·२५ टक्क्यानें व ०·५ टक्क्यानें वाढविण्यांत येणार आहेत. श्रेणींच्या बाबतींतहि कांहीं फेरफार करण्यांत येईल. तसेंच सध्यांच्या कायद्याप्रमाणें, नव्या कंपन्यांच्या बाबतींत पहिल्या पांच वर्षांत शेअर्सच्या बाबतींत देण्यांत येणारी सूट रद्द करण्यांत येणार आहे आणि त्यामुळें संपत्तिकरापासून दोन कोटी रुपये अधिक मिळतील.

(९) सर्व प्रत्यक्ष करांमुळें सबंध वर्षांत एकूण २७·२ कोटी रुपये उत्पन्न मिळेल असा अंदाज आहे.

## अप्रत्यक्ष कर

(१) असंस्कारित तंबाकू आणि सिगारेटी यांवरील अबकारी कराचें प्रमाण बदलण्यांत येणार आहे. त्यामुळें त्यापासून एका संपूर्ण वर्षांत ५·२८ कोटी रुपये मिळतील.

(२) सुती कापड आणि सूत यांवरील कराच्या सर्वसाधारण आकारणींत फेरबदल केला जाईल. कापडाच्या दर्जानुसार कर-आकारणी कांहीं अंशीं वाढत जावी अशा रीतीनें सुतावरील करांत बदल करण्यांत येणार आहे. कापडावर करण्यांत येणाऱ्या प्रक्रियेवरील कराहि वाढविण्याचा विचार आहे. ग्रे अनब्लिच्ड सुती कापडावरील कर कमी करण्यांत येईल. त्याचप्रमाणें ५० वा त्याहून अधिक बीजमाग असलेल्या गिरण्यांचा, कताई आणि विणकाम होणाऱ्या गिरण्यांप्रमाणेंच विचार करण्यांत येईल. ५ ते ४० बीजमाग असलेल्या गिरण्यांवरील कंपाउंड लेव्हीहि वाढविण्यांत येईल. चार वा कमी मागाच्या गिरण्यांस यांतून सूट मिळेल. या फेरबदलांमुळें सुती कापड व सुतापासून मिळणाऱ्या या उत्पन्नांत दरवर्षी १२·१ कोटी रुपये वाढ होईल.

(३) ५० आगकाड्या असलेल्या पेट्यांवरील करांत फेरबदल करण्यांत येणार आहे. या पेट्यांचे किरकोळ विक्रेते प्रत्येक पेटी ६ नया पैशांस विकून घेत असलेला अयोग्य नफा काढून टाकणें असा त्यामागील हेतु आहे. यामुळें दरवर्षी उत्पन्नांत १·९९ कोटी रुपयांची भर पडेल.

(५) चहा निर्यातीस उत्तेजन मिळावें म्हणून सुट्या चहावरील कर दर किलोग्रामला ५ ते १० नया पैशांनीं वाढविण्यांत येईल, आणि निर्यात व्हावयाच्या चहावरील करांत दर किलोग्रामला १५ नये पैसे सूट मिळेल.

(६) सध्यांच्या अबकारी करांतील या बदलांमुळें एका संपूर्ण वर्षांत २०·७४ कोटी रुपये वसूल होतील.

(७) नव्या नऊ वस्तूंवर अबकारी कर बसविण्याचा विचार आहे. ह्या वस्तू म्हणजे तागाचा तयार माल, लोखंड, पोलादाच्या कांहीं वस्तू, विजेच्या केबल व तारा, कांहीं विशिष्ट ॲसिड व गॅस, प्लायवुड, ॲस्बेस्टॉस, सिमेंटच्या वस्तू, ट्रेड रबर व लॅटेक्स फोम स्पंज, ग्रामोफोन, त्याचे सुटे भाग आणि रेकॉर्ड्स् व कांहीं खनिज तेलें आणि त्यांचे पदार्थ. या नव्या करांपासून एका संपूर्ण वर्षांत एकूण १५·४२ कोटी रुपये उत्पन्न येईल.

(८) सहा वस्तूंवरील कस्टम जकात वाढविण्यांत येईल. कांहीं लोखंडी व पोलादी वस्तू तसेंच कृत्रिम रेशमी सूत यांच्यावरील आयात करांत पांच टक्क्यांनीं वाढ करण्यांत येईल. स्टेनलेस स्टीलचे पत्रे व ठोकळे यांच्यावर २५ टक्के जकात आकारण्यांत येईल. सोबन्यावरील जकात २५ आणि १५ टक्के करण्यांत येईल व तरीहि ही कमाल मर्यादेच्या आंतच राहील. मशीन टूल्स व शेतकी अवजारें वगळून इतर कांहीं यांत्रिक हत्यारांवरील जकात ३५ टक्क्यांवरून ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत येईल याशिवाय आणखी कांहीं वस्तूंवरील जकातीचें वाजवीकरण करण्यांत येईल.

(९) मोटार गाड्यांवरील आयात जकातीचें प्रमाण शंभर टक्क्यांवरून दीडशें टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत येईल. तथापि योग्य बाबतींत छोट्या व वापरलेल्या मोटार गाड्यांच्या आयातीस अडचण येऊं नये म्हणून ६,००० रुपयांची स्पेसिफिक ड्यूटी काढून टाकण्यांत येईल.

(१०) चहाच्या निर्यात जकातींत दर किलोग्राममागें ४४ नये पैसे ते २५ नये पैसे कपात करण्यांत येईल आणि त्यामुळें ४·१ कोट रुपयांचें नुकसान होईल त्याचबरोबर दर किलोग्राममागें १५ नये पैसे या प्रमाणांत अबकारी कर परत करण्याचा विचार असल्यामुळें चहाच्या निर्यातीस बरेंच उत्तेजन मिळेल.

या अप्रत्यक्ष करांमुळें एका संपूर्ण वर्षांत ४४·९ कोटी रुपयांचें उत्पन्न येईल. परंतु चालू वर्षांत तें ९३·७ टक्के भरेल.

## ऊंस

महाराष्ट्र राज्यांत ऊंस हें फार महत्त्वाचें पैसा मिळवून देणारें पीक आहे. गेल्या अदमासें २० वर्षांत उसाच्या पिकामुळें ऊंस पिकविणाऱ्या भागांत क्रांति घडवून आणली आहे व म्हणूनच सध्यां महाराष्ट्रांत उसाच्या पिकास महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झालें आहे. महाराष्ट्र राज्यांत साखर, गूळ व खांडसारी तयार करण्यास लागणाऱ्या मूलभूत कच्च्या मालास उसाचाच पुरवठा लागतो. उसाच्या धंद्यास कापसाचे धंद्याचे खालोखाल स्थान आहे आणि त्यापासून ऊंस–बागायतदार, कारखानदार आणि सरकार यांच्या उत्पन्नांत बऱ्याच प्रमाणांत भर पडते. महाराष्ट्रांतील हवामान आणि भौगोलिक परिस्थिति उसाचे पिकास फार योग्य असल्यामुळें येणारें एकरी उत्पन्न हें खूपच जास्त आहे. भारतांतील एकूण क्षेत्राच्या ५·७ टक्के उसाचें क्षेत्र महाराष्ट्र राज्यांत आहे. पण भारतांतील एकूण उत्पन्नाच्या १०·८२ टक्के उत्पन्न महाराष्ट्र राज्यांत होतें हें खालील आंकडेवारीवरून लक्षांत येईल.

क्षेत्र

| विभाग | एकूण क्षेत्र | महाराष्ट्रांतील टक्केवारी |
|---|---|---|
| | एकर | |
| भारत ... | ५१,७८,००० | ...... |
| महाराष्ट्र ... | २,९५,१३५ | ५·७ |
| | उसाचें उत्पन्न ( टनांत ) | |
| भारत ... ... | ७,५०,३८,००० | ...... |
| महाराष्ट्र ... | ८१,१९,००० | १०·८ |

विभागवार क्षेत्र

| | एकर |
|---|---|
| दख्खन ... ... ... | १,६३,६८४ |
| कोल्हापूर ... ... ... | ८०,७६३ |
| कोंकण ... ... ... | ५६१ |
| विदर्भ ... ... ... | ६,९७५ |
| मराठवाडा ... ... ... | ४३,१५२ |

पिकाच्या क्षेत्रफळाची जिल्हानिहाय वर्गवारी

| उसाचें क्षेत्रफळ | जिल्हे |
|---|---|
| ७५ ते ३० हजार एकर | ... अहमदनगर व कोल्हापूर. |
| ३० ते २० हजार एकर | ... नाशिक व पुणें. |
| २० ते ५ हजार एकर | ... औरंगाबाद, उस्मानाबाद, सोलापूर, सातारा व सांगली. |
| ५ ते १ हजार एकर | ... जळगांव, धुळें, बुलढाणा, भंडारा, परभणी, नांदेड व बीड. |
| ११ ते १/२ हजार एकर | ... यवतमाळ व चांदा. |
| ५०० एकरांपेक्षा कमी | ... अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, ठाणें, कुलाबा व रत्नागिरी. |

## केरळांत रेयॉन पल्प फॅक्टरी

ग्वाल्हेरची रेयॉन पल्प कंपनी केरळमधील कोझीकोड येथें एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. केरळमधील बांबूच्या बनाचा ह्या कामीं उपयोग करण्यांत येणार आहे. तथापि, कारखाना काढण्यापूर्वी केरळमधील जंगलांची पाहाणी करण्यांत येणार आहे. पहाणीच्या कामांत केरळ सरकार मदत करणार आहे व त्याचा सर्व खर्च ग्वाल्हेर रेयॉन कंपनी सोसणार आहे.

## धूम्रपानाविरुद्ध जोराची मोहीम

धूम्रपानामुळें फुफ्फुसाचा कॅन्सर होण्याचा संभव वाढतो असें मत ब्रिटनमधील डॉक्टर्सच्या संघटनेनें व्यक्त केलें आहे. त्यामुळें ब्रिटनमध्यें धूम्रपान विरोधी वातावरण वाढूं लागलें आहे. धूम्रपानाविरुद्ध करण्यांत येणाऱ्या मोहिमेंत ब्रिटिश सरकाराहि जोरानें भाग घेऊ लागले आहे. धूम्रपानाचे धोके दर्शविणारीं लक्षावधी भित्तीपत्रकें छापण्यांत आलीं असून तीं लवकरच सर्व देशभर चिकटविण्यांत येतील.

## पांच कंपन्यांना अधिक भांडवल उभारण्यास परवानगी

कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज यांनीं अगदीं अलीकडेच एकूण पांच कंपन्यांना एकूण ६८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम उभारण्यास मान्यता दिली आहे. या कंपन्या व त्यांचें भांडवल पुढीलप्रमाणें :—

हिंदुस्थान स्टील लि. रांची: ६७ कोटी रुपये; बँक ऑफ बडोदा मुंबई: १ कोटी रुपये; गोद्रेज अ‍ॅण्ड बायस मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रा. लि. मुंबई: ३६ लक्ष रुपये; दि नॅशनल इंडिया रबर वर्क्स लि. कटनी (मध्यप्रदेश): ५०,००० रुपये; व पेपर प्रॉडक्टस् लि. दिल्ली: १६ लक्ष रुपये.

**The Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited**

# NOTICE

The Nineteenth Annual General Meeting of the Share-holders of the Company will be held at the Registered Office at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Friday, the 1st June, 1962 at 1–30 p. m. to adopt the Directors' Report and audited accounts for the year ended 31st December, 1961, to declare a dividend, to elect directors and appoint auditors. Special Resolution and related explanatory statement are given in detail in the Notice posted individually to the Share-holders.

A member entitled to attend and vote at the meeting is entitled to appoint a proxy who will attend and vote instead of himself when poll is demanded and the proxy need not be a member.

The Share Transfer Books will be closed from May 22 to June 1, 1962, both days inclusive.

A member whose total income is less than the minimum liable to income tax will please file with the Compny the Exemption Certificate issued by the Incometax Officer on or before June 30, 1962 so that payment of the dividend amount in full can be arranged.

By order of the Board,
For OGALE BROTHERS (Private) LTD.,
Managing Agent,
D. P. OGALE,
Director.

Registered Office :
Manjummel,
Udyogamandal, Alwaye.
March 29, 1962.

## बँकेकडे गहाण टाकलेले दागिने चोरीला गेले, तर?

### कर्जदारांना त्याची भरपाई करणें, योग्य खर्च आहे

" बँकेकडे गहाण टाकलेले दागिने दरोडेखोरांनीं तेथून लुटून नेल्यानंतर त्या दागिन्यांची किंमत बँकेनें कर्जदारांना भरून दिली, तर तो खर्च बँकेच्या व्यवसायाला आवश्यकच होतो आणि इन्कमटॅक्सच्या आकारणींत ती रक्कम वजा करण्यांत आली पाहिजे. " असा निवाडा अलाहाबाद हायकोर्टानें केला आहे. इन्कमटॅक्स ट्रायब्यूनलनें केलेल्या विचारणेवरून हायकोर्टानें वरील निर्णय दिला.

११ जून, १९५१ रोजीं नैनिताल बँक लि. च्या रामनगर शाखेवर दरोडा पडला आणि दरोडेखोरांनीं १,००,००० रुपयांच्या चलनी नोटा व बँकेकडे गहाण असलेले दागिने लुटून नेले. बँकेनें आपल्या कर्जदारांच्या येण्या देण्याचा हिशेब केला आणि त्यांना १९५३-५४ मध्यें ४८,८९१ रु. ची आणि १९५४-५५ मध्यें १,२१,७६० रु. ची भरपाई केली. ह्या रकमा इन्कमटॅक्सच्या आकारणींतून वजा केल्या जाव्यात असें बँकेचें म्हणणें होतें व त्याप्रमाणें तिनें मागणी केली. " जे दागिने नाहींसे झाले, त्यांची भरपाई करण्यास बँक त्यांचेमधील करारानें बांधलेली नव्हती. तरीसुद्धां व्यवसायाच्या दृष्टीनें ही दिलेली सवलत योग्यच होती. बँकेच्या भवितव्याच्या दृष्टीनें, पुढील धोरणानें, ह्या रकमा देण्यांत आल्या. आपल्या गिऱ्हाइकांचा विश्वास टिकविणें हाहि त्यांत हेतु होता. सबब इन्कमटॅक्स कायद्याच्या १० (२) (V) कलमान्वयें ह्या रकमा वजा घालतां येतात. " असें हायकोर्टानें नमूद केलें.

---

### बिहारमधील सोन नदीवर पूल

बिहारमधून वहाणाऱ्या सोन नदीवर एक मोठा पूल बांधण्यास मध्यवर्ती सरकारनें परवानगी दिली आहे. देशांतील राजरस्त्यांचा विकास करण्यासाठी इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशननें जें २९ कोटी रुपयांचें कर्ज दिलें आहे, त्यांतून पुलाचा खर्च करण्यांत येणार आहे. उत्तरभारत व पूर्वभारत ह्यांना जोडणाऱ्या मोठ्या राजरस्त्यावर हा पूल बांधण्यांत येणार आहे. पूल १०,४६० फूट म्हणजे भारतामधील सर्वांत लांब पूल होईल. बिहारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें पूल बांधण्यासाठीं जगांतील मोठमोठ्या कंपन्यांकडून टेंडर्स मागविलीं आहेत. पूल पुरा झाल्यावर लांबच्या ठिकाणीं मालाची वहातूक करण्याचें काम बरेंच जलद करतां येईल. पूर्व भारताला पुलाचा विशेष फायदा होईल.

---

### बद्रिनाथ आणि केदारनाथ

केदारनाथ ( ११,७५० फू. ) आणि बद्रिनाथ ( १०,३०० फू. ) हीं हिमालयांतील पवित्र मंदिरें अनुक्रमें १ मे व ६ मे रोजीं पुनः खुलीं होत आहेत. हृषिकेश ते जोशीमठ बसेस सुरू झाल्यामुळें यात्रेकरूंची सोय झाली आहे.

---

### पगाराची जप्ती

सध्यांच्या कायद्याप्रमाणें १०० रुपयांपर्यंतच्या पगारावर जप्ती आणतां येत नाहीं. माफीची ही मर्यादा वाढवून १५० रुपये करण्यांत यावयाची आहे. त्याबाबत राज्य सरकारांचीं मतें मागविण्यांत येत आहेत. तीं विचारांत घेऊन सिव्हिल प्रोसीजर कोडमध्यें दुरुस्ती केली जाईल.

---

## महाराष्ट्र बँकेचे श्री. मनोहर ह्यांचा मृत्यु

### सुऱ्याच्या हल्ल्याचा बळी

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या मुंबई येथील बाँबे सेंट्रल शाखेचे एजंट, श्री. के. एस. मनोहर हे दि. १६ एप्रिल रोजीं दुपारीं १ वाजतां, सुटीच्या वेळांत, शाखेच्या कचेरींतच मारले गेले! एका माणसानें त्यांचेवर सुऱ्यानें हल्ला केला आणि तो पळून जाऊं लागला. बँकेच्या शिपायानें त्याला शिताफीनें, त्याच्या सुऱ्याचा वार चुकवून, पकडलें; नंतर त्याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यांत आलें. श्री. मनोहर हे २८ वर्षांचे होते. त्यांचा विवाह गेल्याच वर्षीं झाला होता. १९५१ मध्यें त्यांनीं बँकेच्या नोकरींत प्रवेश केला. नोकरी करीत असतांनाच ते बी. कॉम परीक्षा पास झाले आणि सी. ए. आय. आय. बी. चा पहिला भागहि उत्तीर्ण झाले. १९५८ मध्यें त्यांना ऑफिसर करण्यांत आलें.

श्री. मनोहर ह्यांच्या स्मशानयात्रेस श्री. वर्दे ( चेअरमन ), श्री. जोग ( जनरल मॅनेजर ) व श्री. धर्माधिकारी, त्याचप्रमाणें मुंबईतील शाखांमधील नोकर हजर होते.

---

### नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

बँकेच्या हरसुल (ता. पेठ) शाखेचें उद्‌घाटन सोमवार दिनांक १०-४-१९६२ रोजीं नामदार श्री. के. सि. सोनवणे सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे शुभहस्तें झालें.

---




पैसे नेहमीं हाताशीं असले कीं, वाटेल तेव्हां उपयोगी पडतील असं मला वाटत असे. पण त्यांत चोरीला जाण्याची, हरवण्याची भीति असते. या उलट महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहतात व बचतीची संवय लागते; त्यावर आकर्षक व्याजहि मिळतें. आणि तिसरें म्हणजे प्रत्येक व्यवहाराची नोंद पास बुकावर राहते. महाराष्ट्र बँकेंत खातं चालवणं तर इतकं सोपं आहे कीं, जणूं पैसे हाताशींच आहेत असं वाटतं. आपणहि महाराष्ट्र बँकेंत खातें उघडा. तेथील शाखाधिकारी आपणांस आपुलकीनें बँकेच्या अनेक सोयी समजावून सांगतील.

Pratibha-62.7

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

# BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

## *Eighteenth Annual Report of the Directors*

*Gentlemen,*

Your Board of Directors has great pleasure to submit to you the report together with Audited Balance Sheet and Profit and Loss Account of the Bank for the year ended on 31st December 1961.

The transactions during the year under report resulted in a net profit of Rs. 7735—75 nP. Adding to this Rs. 224—32 nP being the balance brought forward from the last year's account, the amount available for distribution is Rs. 7960—07 nP. Your Directors recommend to distribute this amount as under :—

| | | |
|---|---|---|
| 1. | To transfer to Reserve Account | Rs. 1547—00 |
| 2 | To provide for Income Tax | Rs. 4042—00 |
| 3. | To provide for Bad and Doubtful debt | Rs. 2000—00 |
| 4. | To carry forward to the next year's account . | Rs. 371—07 |
| | Total | Rs. 7960—07 |

Your Board after careful consideration has decided not to declare any dividend this year.

Advisory Committees at Bhor, Pali and Shirval are rendering useful service in the conduct of the business. Your Board is thankful to all the members of the Local Advisory Committees and other Government Officials for their co operation. Your Board of Directors wishes to say that after the merger of States several difficulties had to be faced in the process of recovery due to various laws, but inspite of all these difficulties, it is being recovered satisfactorily.

Your Board is glad to state that the constituents are taking the best advantage of our Safe Deposit Vault and safe custody at Bhor. Various constituents are getting advantage of Godown facilities at Bhor, Pali and Shirwal.

Shri G. B. Devi retires under Article 115 of the Artictes of Association and section 280 of Companies Act 1956. He is eligible to and offers himself for re-election. Shri G. B. Devi is of the age of 67 years. A notice persuant to Section 281 of Companies Act, 1956 regarding this has been received by the Bank. A special notice thereof is sent with the report.

Ex-Director Raosaheb Y. D. Khole, and Legal adviser Shri G. P. Parkhi, B A., LL. B. Advocate are always giving benefit of their experience with their valuable services in all important matters referred to them for which your Board is much thankful to them.

As mentioned in the last report your Board of Directors is still under correspondence with the State Bank of India for amalgamation of our Bank with them and their reply is awaited.

Your Board place on record the appreciation for the work done by the staff.

You are requested to appoint Auditors for the next year and to fix their remuneration.

For self and on behalf of the Board
**M. V. Shingre**
*Chairman*

27th Feb. 1962

---

### दि सांगली बँक लि.

दि सांगली बँक लि. ला १९६१ साली २,६८,६०४ रु. नफा झाला. भागदारांना १५% करप्राप्त डिव्हिडंड वाटण्यांत आलें. बँकेचें वसूल भांडवल ४,५०,००० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ९½ लक्ष रुपयांचेवर आहेत. अहवालाचे वर्षी बँकेमध्यें बँक ऑफ पूना, पूना इन्व्हेस्टर्स बँक आणि फलटण बँक, ह्या बँका विलीन करण्यांत आल्या. त्यामुळें सांगली बँकेच्या कचेऱ्यांत चार आगखी कचेऱ्यांची ( पुणें येथें तीन व फलटण येथें एक ) भर पडून आणि औरंगाबाद येथें नवी शाखा उघडल्यामुळें बँकेच्या एकूण शाखा आतां २४ झाल्या आहेत. बँकेनें वसूल भांडवल ४ लक्ष रुपयांनीं वाढविण्याचें ठरविलें असून त्याच्या विक्रीसाठी कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजची परवानगी मागितली आहे. नवें भांडवल विक्री झाल्यावर वसूल भांडवल ८½ लक्ष रु. होईल.

### सहकारी परिषद् पुढें ढकलली

महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेचें २४ वें अधिवेशन पुणें येथें ५ आणि ६ मे रोजीं भरणार होतें, तें पुढें ढकलण्यांत आलें आहे.

### आरे गौळवाड्यांतील पाण्याचा पुरवठा

मुंबई कॉर्पोरेशनचे कमिशनर डॉ. शेख ह्यांनीं कॉर्पोरेशनच्या स्थायी समितींत अशी माहिती सांगितली कीं, आरे येथील गौळवाड्यांच्या वापरासाठी तुळशी तलावांतून घेतलेलें २० लाख गॅलन पाणी शुद्ध करून रोज पुरविलें जातें. ह्या पाण्यापैकी १० लाख गॅलन पाणी म्हशी धुण्यासाठी वापरले जातें. गौळवाड्याला पवई तळ्यांतील पाणी पुरविण्यांत यावें व वरील शुद्ध केलेलें १० लाख गॅलन पाणी मुंबई शहराला पुरविण्यांत यावें असा हुकूम त्यांनीं काढला आहे.

### गौळवाड्यांतील जनावरांसाठी धान्य

अमेरिकेच्या घास धान्य मंडळाचे तीन सभासद भारताच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनीं भारताचा दोन आठवड्यांचा दौरा केला. अमेरिकेंतील मका व जोंधळा ह्यांचा पुरवठा भारतामधील गौळवाड्यांतील दुभत्या जनावरांना आणि कोंबडी पाळणाऱ्यांना करणें कितपत शक्य आहे ह्याचा आढावा त्यांनीं घेतला. भारतांत जनावरांना लागणारें कमी प्रतीचें धान्य पिकविण्यास पुष्कळ वाव आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

# BHOR STATE BANK

## BALANCE SHEET AS

| 31-12-1960 | CAPITAL & LIABILITIES | | 31-12-1961 |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| | **1. Capital** | | |
| | AUTHORISED CAPITAL : | | |
| 5,00,000—00 | 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—00 |
| | ISSUED CAPITAL : | | |
| 5,00,000—00 | 10,000 Shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—00 |
| | SUBSCRIBED, CALLED UP AND PAID-UP CAPITAL : | | |
| 5,00,000—00 | 10,000 shares of Rs. 50/- each ... | | 5,00,000—00 |
| 2,50 000—00 | Amount Called up and paid up at Rs.25/- per Share | | 2,50,000—00 |
| 51,500—00 | **2. Reserve Fund and Other Reserves :** | | |
| | Reserve : Amount as per last Balance Sheet ... | 51,500—00 | |
| | Appropriation during the year ... | 2,160—00 | 53,660—00 |
| | **3. Deposits and Other Accounts :** | | |
| 6 21,100—00 | Fixed Deposits ... | 5,07,300—00 | |
| 8,16,299—28 | Savings Bank Deposits ... | 8,33,551—62 | |
| 3,06,939—79 | Current accounts, Contingency accounts etc. ... | 2,64,004—63 | 16,04,856—25 |
| | **4. Borrowing from other Banking Companies Agents etc. :** | | |
| 5,047—38 | ( i ) In India ... | 79,589—65 | |
| Nil | ( ii ) Outside India ... | Nil | 79,589—65 |
| | **Particulars** | | |
| Nil | ( i ) Secured against Central and State Govt. and other trustee securities, shown as per contra. Rs. 79,589—65 ... | | |
| Nil | ( ii ) Un-Secured " ... | | |
| Nil | **5. Bills Payable** | | Nil |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra :** | | Nil |
| 7,719—36 | ( i ) Payable in India ... | 8,968—14 | |
| | ( ii ) Payable outside India ... | | 8,968—14 |
| | **7. Other Liabilities :** | | |
| 4,104—63 | ( i ) For Expenses ... | 3,360—79 | |
| 14,334—51 | ( ii ) Provident Fund, ( Invested as per Contra ) | 16,746—21 | |
| 7,977—72 | (iii) Branch Adjustments ( Net ) ... | 3,745—98 | 23,852—98 |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and other obligations as per Contra :** ... | | Nil |
| | **9. Profit and Loss :** | | |
| 5,807—58 | Profit as per last Balance Sheet. ... | 10,884—32 | |
| | *Less* : Appropriations : ... | | |
| 1,100—00 | Provision for Bad and doubtful debts 2300/- | | |
| 1,200—00 | Reserve Fund 2160/- | | |
| 3,400—00 | Provision for income-tax 6200/- | 10,660—00 | |
| | | 224—32 | |
| 10,776—74 | *Add* : Net profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss Account. ... | 7,735—75 | 7,960—07 |
| Nil | **10. Contingent Liabilities :** | | Nil |
| 20,95,906—99 | | | 20,28,887—09 |

# LIMITED, BHOR.

**AT 31st DECEMBER, 1961**

| 31-12-1960 | PROPERTY & ASSETS | | 31-12-1961 |
|---|---|---|---|
| Rs. nP. | | Rs. nP. | Rs. nP. |
| 1,50,848—10 | **1. Cash** In hand and with the Reserve Bank and State Bank ( Including foreign currency notes ) ... | | 1,54,198—84 |
| | **2. Balances with other Banks** ( In Deposit Account, Current Account and Postal Saving Account Rs. 1859—43 earmarked for Provident Fund ). | | |
| 17,975—96 | ( i ) In India ... | 8,135—65 | |
| Nil | ( ii ) Outside India ... | Nil | 8,135—65 |
| 2,50,000—00 | **3. Money at Call and Short Notice** | | 3,50,000—00 |
| | **4 Investments ( at cost )** ( Face value Rs. 7,21,600-00 ) ( Market value Rs. 6,88,555-35 ) ... | | 7,16,567—86 |
| 8,67,322—87 | ( i ) Securities of the Central and State Government and other trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ( Of these Securities of the face value of Rs. 15,900-00 are earmarked for Provident Fund. Securities of the Face Value of Rs. 5,00,000 are pledged with Banking Companies for over-draft arrangements ). ... | 7,15,922—86 | |
